**भाग – 'अ'**

(न्यायनिर्णयाचे शिर्ष पृष्ठ)

(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))

MHWS040016652021

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर यांचे न्यायालय**

**( न्यायाधीश–ख्वाजा चॉ. कलाल )**

**(न्यायनिर्णय दिनांक २१.०४.२०२६)**

**नियमित फौजदारी प्रकरण क्र. १८८/२०२१**

**निशाणी क्र.३३**

प्रथम खबरी अहवाल/गुन्हा व पोलीस ठाणेचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार/फिर्यादी | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, मंगरूळपीर,<br>ता.जि.वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>**श्री. एस. एम. बाकलीवाल** |
| आरोपी | | **१. विष्णु पांडुरंग हजारे,**<br>वय : ४२ वर्षे, धंदा : शेती,<br>**२. योगेश विष्णु हजारे,**<br>वय : २२ वर्षे, धंदा : शेती,<br>**३. आशिष विष्णु हजारे,**<br>वय : २० वर्षे, धंदा : शेती,<br>**४. विजय विष्णु हजारे,**<br>वय : १८ वर्षे, धंदा : शेती,<br>सर्व रा. माळशेलू, ता.मंगरूळपीर जि. वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | | **श्री. एम. डी. गिर्डेकर** |

**भाग–ब**

(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २४.०६.२०२१ |
| प्रथम खबर अहवालची तारीख | २५.०६.२०२१ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०३.०८.२०२१ |
| दोषारोप ठेवण्यात आल्याची तारीख | १०.०२.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव केल्याची तारीख | २१.०४.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | २१.०४.२०२६ |
| शिक्षेची तारीख, असेल तर | निरंक |

**<u>आरोपीचा तपशील</u> —**

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत तारीख | गुन्हयाचे विवरण | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षेचा कालावधी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार कारावासाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | **विष्णु पांडुरंग हजारे**<br>**योगेश विष्णु हजारे**<br>**आशिष विष्णु हजारे**<br>**विजय विष्णु हजारे** | समज पत्रा वर सोडले | निरंक | भा.दं.वि.चे कलम २९४,३२३ व ५०६ सह ३४ | निर्दोष | निरंक | लागू नाही. |

**<u>भाग—'क'</u>**

(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (३))

सरकारी/आरोपींचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. — सरकारी साक्षीदार :—**

| **दर्जा** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| १. | सतिष तुकाराम गुजर | फिर्यादी |
| २. | तुकाराम किसन गुजर | साक्षीदार |
| ३. | सौ. पुष्पा तुकाराम गुजर | साक्षीदार |
| ४. | रूपेश तुकाराम गुजर | साक्षीदार |

**ब. — आरोपीचे साक्षीदार :—**

| **दर्जा** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. — न्यायालयाचे साक्षीदार :—**

| **दर्जा** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## सरकारी/आरोपीचे/न्यायालयातील निशाणी दस्तऐवज.

**अ. — सरकारी दस्तऐवज :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. — बचावपक्ष दस्तऐवज :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. — न्यायालयीन दस्तऐवज :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. — साहित्य/वस्तू :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | — | — |

## न्या य नि र्ण य

**(घोषीत दिनांक २१.०४.२०२६)**

१. आरोपीचे विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे —**

२. दिनांक २४.०६.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या घरा समोर, ग्राम माळशेलू, ता. मंगरूळपीर, जि.वाशिम येथे घटना घडली. सदर दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ विष्णु, आरोपी क्र.२ योगेश, आरोपी क्र.३ आशिष व आरोपी क्र.४ विजय हे आले व फिर्यादीला म्हणाले की, ''मादरचोदा, तु हमेशा आमच्या घराकडे का पाहतो तु जास्त माजला का, तुझा माज उतरावा लागतो'' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यांना ''तुम्ही मला अशी घान शिवीगाळ का करता'' असे विचारले असता आरोपी क्र.२ याने फिर्यादीच्या चाळ्यावर मुठदगड मारला. त्यावेळी फिर्यादीचे आई—वडिल भांडण सोडविण्याकरीता गेले असता आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या वडिलांच्या हातावर कु—हाडीचा दांडा मारून त्यांच्या पोटावर व डोक्यावर मारहाण केली. आरोपी क्र.३ व ४ यांनी फिर्यादीला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीच्या आईच्या पायावर दगड

मारला. आरोपी क्र.३ व ४ यांनी फिर्यादीला ''भाडखावुचेहो, तुम्ही लय माजले, तुमच्या मायला झव'' अशी शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींच्या विरुध्द मंगरूळपीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपींचे विरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.६९०/२०२० दाखल झाला. सदर गुन्हयाच्या तपासांती पोलीस नाईक ब.नं.१८९ संतोष मनवर यांनी आरोपींच्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**३.** आरोपींचे विरुध्द भारतीय दंड संहिता, कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप निशाणी क्र.१३ वर ठेवले. आरोपींनी गुन्हा कबूल न करता संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षाच्या साक्षीपुराव्यात आरोपींच्या विरुध्द काहीही आले नसल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही. आरोपींतर्फे एकही साक्षीदार तपासण्यांत आला नाही.

**४.** अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. एम. बाकलीवाल व आरोपीतर्फे श्री. एम. डी. गिर्डेकर यांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीकत, न्यायालयासमोर आलेला साक्षीपुरावा आणि उभयंताचा युक्तीवाद विचारात घेता पुढील वादप्रश्न उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक २४.०६.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या घरासमोर, ग्राम माळशेलू, ता.मंगरूळपीर, जि. वाशिम येथे आरोपींनी सामाईक उद्देशाने फिर्यादीस ''मादरचोदा, तु हमेशा आमच्या घराकडे का पाहतो तु जास्त माजला का, तुझा माज उतरावा लागतो व तुझया मायला झव'' तसेच आरोपी क्र.३ व ४ यांनी फिर्यादीला ''भाडखावुचेहो, तुम्ही लय माजले, तुमच्या मायला झव'' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व त्यायोगे त्यांनी भा.दं.संहितेचे कलम २९४ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | ....... नकारार्थी |
| २) | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी सामाईक उद्देशाने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली | ....... नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | असल्याचे व त्यायोगे त्यांनी भा.दं.संहितेचे कलम ३२३ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय? | |
| ३) | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी सामाईक उद्देशाने फिर्यादी व फिर्यादीच्या आई–वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे व त्यायोगे त्यांनी भा.दं.सं., कलम ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय? | ...... नकारार्थी |
| ४) | काय आदेश ? | ....... अंतिम आदेशान्वये |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करिता :–**

**५.** वादप्रश्न क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ सतिष तुकाराम गुजर (फिर्यादी) याने निशाणी २२ वर, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ तुकाराम किसन गुजर (फिर्यादीचे वडिल) याने निशाणी २५ वर, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.३ सौ. पुष्पा तुकाराम गुजर (फिर्यादीची आई) हीने निशाणी २६ वर व अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.४ रूपेश तुकाराम गुजर (फिर्यादीचा भाउ) याने निशाणी २७ वर साक्ष दिली असून त्यांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीप्रमाणे साक्ष दिली नसल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांना फितूर घोषित करून त्यांचा उलटतपास नोंदविला. मात्र उलटतपासात देखील अभियोग पक्षास आरोपींच्या विरूध्द काही निष्पन्न झाले नाही.

**६.** याउलट अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ ते ४ यांनी उलटतपासात, घटना ही दिनांक २४.०६.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या घरासमोर, ग्राम माळशेलू, ता. मंगरूळपीर, जि.वाशिम येथे घटना घडली, सदर दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ विष्णु, आरोपी क्र.२ योगेश, आरोपी क्र.३ आशिष व आरोपी क्र.४ विजय हे आले व फिर्यादीला म्हणाले की, ''मादरचोदा, तु हमेशा आमच्या घराकडे का पाहतो तु जास्त माजला का, तुझा माज उतरावा लागतो'' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली, फिर्यादीने त्यांना ''तुम्ही मला अशी घान शिवीगाळ का करता'' असे विचारले असता आरोपी क्र.२ याने फिर्यादीच्या चाळ्यावर मुठदगड मारला, त्यावेळी फिर्यादीचे

आई—वडिल भांडण सोडविण्याकरीता गेले असता आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या वडिलांच्या हातावर कु—हाडीचा दांडा मारून त्यांच्या पोटावर व डोक्यावर मारहाण केली, आरोपी क्र.३ व ४ यांनी फिर्यादीला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीच्या आईच्या पायावर दगड मारला, आरोपी क्र.३ व ४ यांनी फिर्यादीला ''भाडखावुचेहो, तुम्ही लय माजले, तुमच्या मायला झव'' अशी शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली, या सर्व बाबी नाकारल्या. त्यामुळे त्यांची जबानी अभियोगपक्षाच्या उपयोगाची नाही.

७. विशेष बाब म्हणजे फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असल्याची बाब त्यांनी त्यांच्या उलटतपासात कबूल केल्याचे न्यायालयासमोर आले व त्यांनी त्याबाबतचा आपसी तडजोडीचा लेख निशाणी क्र.२१ वर दाखल केली आहे.

८. आरोपीं तर्फे निशाणी क्र. २८ ते ३० वर फिर्यादीचे वैदयकीय प्रमाणपत्र व निशाणी ३१ वर घटनास्थळाचा पंचनामा मान्य करण्यात आला. परंतू अभियोग पक्षाच्या साक्षीदार क्र.१ ते ४ यांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीप्रमाणे साक्ष दिली नसल्यामुळे त्यास महत्व प्राप्त होत नाही. सबब, अभियोग पक्षाची हकीकत ही शाबीत झाली नाही. त्यामुळे आरोपींच्या विरुध्द असलेला भा.दं.संहितेचे कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप नि: संशयरित्या शाबीत होत नाही. त्यायोगे आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. सबब वादप्रश्न क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**<u>वादप्रश्न क्रमांक ०४ करिता</u> :—**

९. वादप्रश्न क्रमांक १ ते ३ च्या निष्कर्षान्वये आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या अनुमानास मी पोहचलेलो आहे. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक ०४ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपी क्र.१ विष्णु, आरोपी क्र.२ योगेश, आरोपी क्र.३ आशिष व आरोपी क्र.४ विजय, यांची भारतीय दंड संहिताचे, कलम २९४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता, कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचे बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३) सदर प्रकरणात जप्त मुद्देमाल नसल्याने त्याबाबत आदेश नाही.

४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ अन्वये आरोपींनी जामीनाची पुर्तता करावी.

KHAJA CHANDSAB KALAL

Digitally signed by KHAJA CHANDSAB KALAL
Date: 2026.04.21 18:03:48 +0530

दिनांक : २१/०४/२०२६

**(ख्वाजा चॉ. कलाल)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर,
ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Khwaja C. Kalal |
| Judgment uploaded by | :- | Shri. S. S. Rathod (Jr. Clerk) |
| Date of Judgment | :- | 21/04/2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 21/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 21/04/2026 |